admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र:मकृप/शिक्षण-१/२२१८/२२८९

दिनांक १९ ऑक्टोबर,२०१८

## प रि प त्र क

**विषय:-** सन २०१८-१९ या वर्षाच्या कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा भरण्याकरिता जागेवरील प्रवेश फेरी राबविण्याबाबत.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया नियोजित वेळापत्रकानुसार दि. ३०/८/२०१८ रोजी पूर्ण झाली. तथापि, सदरील अभ्यासक्रमामध्ये मोठया प्रमाणात जागा रिक्त आहेत. ही बाब विचारात घेता, नवीन प्रवेश अर्ज मागवून गुणवत्तेनुसार प्रत्येक विद्यालयस्तरावर रिक्त जागा भरण्यास मंजुरी मिळण्याबाबत कृषी परिषद कार्यालयाकडे निवेदने प्राप्त झाली होती.

यास्तव कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेशोच्छुक उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**उमेदवार व विद्यालयांना प्रवेश प्रकियेविषयी सूचना-**

१. या प्रवेश कार्यक्रमांतर्गत उमेदवारांना **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर विहित प्रवेश अर्ज उपलब्ध करून देण्यात येईल.

२. विहित प्रवेश अर्जामध्ये उमेदवाराने वैय्यक्तिक, शैक्षणिक व इतर माहिती, (प्रवेश अर्ज शुल्कासह) भरावी.

३. ज्या विद्यालयामध्ये प्रवेश घ्यायचा आहे. त्या विद्यालयात मूळ कागदपत्रे व आवश्यक त्या शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित रहावे.

**विषयाधीन प्रवेश प्रकियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्ज [रू.४००/- शुल्कासह (आरक्षित प्रवर्गासाठी रू.२००/-) ] दाखल करण्याचा कालावधी. | १२/१०/२०१८ ते १५/१०/२०१८ |
| २. | नव्याने प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जांची यादीची संकेतस्थळावर प्रसिध्दी. | १६/१०/२०१८ |

Scanned by CamScanner

admn 18-19

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| ३. | ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, अशा विद्यालयात मूळ कागदपत्रे व आवश्यक त्या शुल्कासह उमेदवाराने उपस्थित राहण्याचा कालावधी. | १९/१०/२०१८ व २०/१०/२०१८ |
| ४. | वरील कालावधीत प्रवेशित उमेदवारांच्या यादीस जिल्हयातील घटक / अनुदानित विद्यालयांच्या प्राचार्यांनी मान्यता देण्याचा कालावधी | २२/१०/२०१८ व २३/१०/२०१८ |
| ५. | प्रवेशास मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांनी कृषी तंत्र विद्यालय / निकेतन येथे प्रवेश घेऊन हजर होण्याचा दिनांक | २२/१०/२०१८ |

या परिपत्रकाद्वारे सर्व विद्यालयांना सूचित करण्यात येते की, जादा वर्ग आयोजित करून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा.

(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रति,

१. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

२. सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या सूचना फलकांवर परिपत्रकास प्रसिध्द द्यावी. याचबरोबर आपल्या कृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व कृषी तंत्र विद्यालये / कृषी तंत्र निकेतने यांना त्यांच्यास्तरावर स्वखर्चाने स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्याबाबत सूचित करावे.

२/- यांना असेही सूचित करण्यात येते की, कृषी विद्यापीठांतर्गत शासकीय / अनुदानित विद्यालयांशी सबंधित असलेली विना अनुदानित विद्यालये निश्चित करावी.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व विद्यालयांना तसेच प्रवेशोच्छुकांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे व संगणक प्रणालीमध्ये, विद्यालयांच्या लॉगइनमध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

४. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.

Scanned by CamScanner